# “महात्मा गांधीजी यांचे स्त्री मुक्तीविषयक विचार — एक अभ्यास”

**सौ. मेंगाणे रेणुका राजशेखर संशोधक विद्यार्थीनी**

**सारांश:—**भारत देशाच्या सामाजिक इतिहासात क्रांतीकारी बदल घडवून आणण्याचे महान कार्य ज्या थोर पुरूषांनी केले. त्यात महात्मा गांधीजी हे अग्रगण्य होत. किंबहुना आजच्या सर्व सामाजिक विशेषत: परिवर्तनवादी चळवळीच्या प्रेरणास्थानी वेळोवेळी महात्मा गांधीजींनी मांडलेले विचार व आयुष्यभर केलेले उदंड कार्य आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. समाजात परिवर्तन घडवावयाचे तर सर्वप्रथम स्त्री पुरूष समतेची आवश्यकता विचारात घेणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते.महात्मा गांधीजींनी स्त्रीमुक्ती संदर्भात केवळ विचारच मांडले नाहीत तर आपल्या समाजातील स्त्रीयांचा दर्जा बदलण्यासाठी आणि त्यांना मुक्त करण्यासाठी केलेले वैचारिकरित्या व कृतीरूपी योगदान फार मोलाचे आहे.

**प्रस्तावना:—**समाजामध्ये स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन धर्म, संस्कृती आणि समाजपध्दतीमध्ये पूर्वीपासूनच अंगभूत सापत्नभाव या पायावर आधारलेला होता. जोतिबा फुले, म.गो.रानडे, राजाराममोहन रॉय, आगरकर, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडीत, बाबापद्मनजी, मेहरामजी मलबारी, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई इत्यादींनी समाजातील स्त्रीयाकडे पाहण्याचा मानवाचा दृष्टीकोन बदलण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी समाजात किळसवाण्या प्रथा होत्या त्यामध्ये सती, बालविवाह, केशवपन, विधवा स्त्रियांच्या समस्या मोठया प्रमाणात जाणवत होत्या. त्यावेळी वरील समाजसुधारकांनी खुले आव्हान स्विकारले आणि स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी प्रयत्न केले.

**संशोधन विषयक स्पष्टीकरण:—**भारतीय स्त्री परिवर्तनाची सुरवात उशीराच झाली. १८१८ मध्ये राजकीय वर्चस्व ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती आले. राज्यकारभारासाठी सेवकवर्गाची गरज निर्माण झाली. त्यातूनच इंग्रजी शिक्षणाचा पाया भारतात घातला गेला. भारतात दिल्या जाणा—या पारंपारिक शिक्षणापेक्षा हे शिक्षण वेगळे होते या नवशिक्षितांना स्त्रीची परिस्थिती किती दारून आहे हे लक्षात आले. ब्रिटीशांच्या आगमनाबरोबर वसाहत काळात उदारमतवाद ही विचार सरणी भारतात आली. या विचारसरणीचा प्रभाव येथील समाज सुधारकावर हळूहळू पडू लागला. पाश्चिमात्यांच्या उदारमतवादी विचारामुळे स्त्री पुरूष विषमता कमी करण्यास भारतात विविध सुधारकांचे गट निर्माण होऊन कार्य करू लागले आणि नवविचारांचे वारे भारतात ही वहायला लागले.स्त्री सुधारणेची खरी सुरूवात स्त्री—शिक्षणानेच झाली असे म्हणता येईल. १८४८ मध्ये म.फुले यांनी पुण्यात प्रथम मुलींची शाळा सुरू केली. व सावित्रीबाईंच्या सहकार्याने तसे कार्यही केले आणि १८५४ मध्ये उशिरा का होईना कंपनी सरकारने स्त्री शिक्षणाची जबाबदारी मान्य केली. महाराष्ट्रात अहमदनगरला अमेरिकन मिशनचे मोठे केंद्र होते. तेथे मिसेस सिंथिया फरार यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य मोठया नेटाने सुरू केले होते. १९२६ मध्ये मिसेस फरारांनी स्त्रियांची निवासी शाळा सुरू केली.

१९ व्या शतकांत घडलेल्या घटनामधुनच २० व्या शतकांतील वातारण निर्माण झाले. १९२० हे वर्ष सामाजिक चळवळीकडून राष्ट्रीय चळवळीकडे जाणारे महत्वाचे वर्ष होते. राष्ट्रीय चळवळीमध्ये स्त्रियांना जास्तीत जास्त चालना मिळत होती. येथुनच टिळकांचा काळ संपून महात्मा गांधीचे युग सुरू झाले.या काळात महात्मा गांधीची यांच्या प्रमाणेच डॉ. आंबेडकर, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आदी सुधारकांनी स्त्रियांच्या प्रगतीसाठी व स्त्री मुक्तीसाठी फार मोठे योगदान दिले. स्त्री वर्गाला समान दर्जा मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली आणि हिंदूकडे बिल आणून स्त्रियांना संपत्ती अधिकार मिळवून देण्यासाठी मंत्रीपदाचा त्याग केला. बाबासाहेबांचे विचार स्त्री मुक्तीला दिशा व गती देणारे होते. बाबासाहेबांनी स्त्री मुक्तिचा विचार मानवमुक्ती अंतर्गत केला.

शाहु महाराजांनी स्त्रीयांना शिक्षणाची दारे खुली केली. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणा—या मुलींना फी माफ केली. कोल्हापूर संस्थानात शिक्षणाधिकारी म्हणून प्रथम मिस् लिटल यांची नेमणूक केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली अण्णांचे कार्य पुढे नेण्यासाठी प्रसंगी लक्ष्मीबाईंनी आपले मंगळसूत्र मोडले. महर्षी कर्वे यांनी शारदा सदनमधील गोदूबाई या विधवेशी विवाह केला. विधवांची दु:खे दूर करण्यासाठी 'विधवा विवाह संघ' नावाची संस्था स्थापन केली. सदाशिव पेठेत 'अनाथ बालिकाश्रम' या नावाची संस्था स्थापन केली महिला विद्यापीठाची स्थापना (S.N.D.T.) केली त्यांचे कार्य अद्वितीय आहे. त्याचप्रमाणे विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्री शिक्षणासाठी खास प्रयत्न केले. २० व्या शतकामध्ये अनेक समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या उद्दारासाठी प्रयत्न केले.परंतु महात्मा गांधीखेरीज स्त्रियांच्या संदर्भातील सार्वत्रिक तत्वज्ञान मात्र कोणीही मांडले नाही. गांधीजींच्या राजकीय, सामाजिक, आणि नैतिक विचारांचे एक वैशिष्टये आहे की, त्यांनी जे जे विषय हाती घेतले त्यापैकी बहुतेक विषयांना एक सर्वस्पर्शी स्वरुप देण्याचे कार्य केले. हे करताना ते विचारांच्या कोंडाळयातच गुरफटून राहिले नाहीत. त्यांनी त्यांचे तत्वज्ञान अनुभवाच्या ऐरणीवर पारखून घेतले. त्यांच्या तत्वज्ञानाचा आणि प्रयोगाचा पाया सत्य आणि अहिंसा हाच होता. त्यापासून ते विचलित झाले नाहीत. त्यांचे स्त्रियांविषयीचे तत्वज्ञान केवळ विशिष्ट जातिधर्माच्या चौकटीपूरते किंवा देशाच्या सीमांपुरते मर्यादित राहत नाही, तर जगातील सर्व स्त्रियांनाही लागू पडते.

स्त्रियांशी संबंधीत ज्या सामाजिक संस्था अस्तित्वात आहेत, त्यामध्ये गांधीजींनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान दिले आहे. कुटूंबसंस्था भारतीय समाजव्यवस्थेचा पाया आहे. कुटूंबात स्त्रियांचे स्थान गौन नसून ते पुरूषाच्या 'मित्राचे' आहे असे गांधीजी म्हणतात. 'मित्र' आप्तेष्टांपेक्षाही आप्त असतो. त्याच्यासमोर जितक्या मोकळेपणाने बोलता येते तितके कुणाजवळही बोलता येत नाही. त्यांचा दर्जाही कमी लेखता येत नाही. तो दोषही दाखवतो आणि मार्गदर्शनही करतो.कुटूंबामध्ये मुलगा आणि मुलगी यांचे पालनपोषणही समानतेने व्हावे असा आग्रह गांधीजी धरतात. गांधीजीनी विवाहावर अधिक खर्च न करण्याचा सल्ला दिला. गांधीजींनी आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. हुंडा पध्दतीलाही त्यांचा विरोध होता. पुरूषांच्या बरोबरीने स्वातंत्र्यविषयक सर्व अधिकार गांधीजी स्त्रियांना देतात. हिंदू धर्म मार्तंडानी मनुस्मृतीतील स्त्रियांना गुलाम लेखणारे श्लोक काढुन टाकावेत अशी सूचना करतात. स्त्री—पुरूषामधील विषमता काढून टाकण्यासाठी कायदे केले जावेत काँग्रेसच्या चळवळीत काम करणा—या लोकांना गांधीजीनी आवाहान केले की, स्त्रियांच्या मनातील कनिष्ठपणाचा न्यूनगंड काढून टाकण्यासाठी त्यांनी कार्यक्रम हाती घ्यावेत. त्यांना त्यांच्या प्रतिष्ठेची व सामर्थ्याची जाणीव करून द्यावी, स्त्रियांनी पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करू नये. अर्थात पुरूषांना देखील हाच सल्ला दिला होता.

गांधीजीनी पडद्याच्या पध्दतीला 'क्रूर' म्हटले आहे. देवदासी पध्दतीविषयी तिव्र नापसंती व्यक्त केली होती. पतिपत्नी शिस्तीने विवाह बंधनात राहावयास पाहिजेत. ही शिस्त कोणीही मोडू नये. परंतु गांधीजीनी स्त्रियांवरील अत्याचार आणि अन्याय दूर करण्यासाठी घटस्फोटाचा मार्ग खुला ठेवला. विधवा मुलींच्या पालकांना आवाहन केले की त्यांचे विवाह करा आणि या विवाहांना पुनर्विवाहदेखिल संबोधू नका. धर्मशास्त्र नाकारण्याचे नैतिक धैर्य त्यांनी दाखविले. जगात स्त्री अहिंसेचे मुर्तिमंत स्वरूप आहे असे गांधीजींचे मत होते.स्त्रियांचे शिक्षण कसे असावे व ते केव्हा सुरू व्हावे या बद्दल गांधीजींनी लिहिले आहे. जेवढया सोयी सवलती पुरूषांना मिळतात तेवढया स्त्रियांनाही मिळाल्या पाहिजेत. स्त्रियांसाठी विशेष सोयींची गरज असेल तर त्याही निर्माण करण्यात आल्या पाहिजेत. प्रौढ निरक्षर स्त्री पुरूषांसाठी प्रौढ शिक्षण वर्गाचे महत्व त्यांनी जाणले होते.

महात्मा गांधीजींच्या स्त्री मुक्ती चळवळीला विधवा विवाह, संमत्ती वय, स्त्री शिक्षण याबाबतीत भरघोस यश मिळाले. गांधीजींच्या विचारसरणीने स्त्रीयांच्या प्रगतीला हातभार लागला. स्त्रियांच्या सामाजिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी मार्गारेट किझन्स यांच्या संपादनाखाली 'स्त्रिधर्म' नावे मुखपत्र सुरू केले. डॉ. ॲनी बेझंट यांनी १९१७ मध्ये कॉंग्रेसच्या अध्यक्ष झाल्यावर स्त्रियांना सक्रिय राजकारणात सहभागी होण्याचे आवाहन केले. इंडियन वुमेन्स असोसिएशन ही संस्था स्थापन केली. सर्वसाधारण स्त्रीचाही कुटूंबाच्या अवतीभोवतीच असणारा वावर संपूर्ण वेगळे विश्व त्यांच्यासमोर उलगडून गेले. गांधीजींच्या विचार सरणीने या प्रयत्नांना अधिक हातभार लागला. त्यांची भूमिका स्त्री पुरूष समातनेचा पुरस्कार करणारी होती. गांधीजींनी स्त्रियांना चळवळीत सहभागी करुन महत्वाची कामे सोपविली. सरोजनी नायडू, अरूणा असफली, मधुलक्ष्मी रेड्डी या स्त्रियांचे नेतृत्व करीत होत्या. १९३२ च्या सविनय कायदेभंग १९४० चा महायुध्दा विरोधी सत्याग्रह आणि १९४२ ची चलेजाव चळवळ या सर्व आंदोलनामध्ये स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या.

महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली चाललेल्या असहकाराच्या आणि सत्याग्रहाच्या स्वातंत्र्य लढयाला वेग येत होता. गांधीजींच्या अहिंसक आंदोलनात स्त्रिया मोठया प्रमाणात सामील झाल्या. गांधीजींना स्त्रियांच्या प्रश्नांची चांगली जाण होती. देशस्वांतत्र या इतकाच स्त्रियांच्या सामाजिक उध्दाराचा गांधीजींना ध्यास लागला होता.सत्याग्रहासाठी आवश्यक असलेले धैर्य आणि आत्मक्लेश सहन करण्याची शक्ती स्त्रियांकडे विशेष करून असल्याने स्वातंत्र्यलढयात स्त्रिया महत्वाची कामगिरी बजावू शकतील हे गांधीजींचे प्रतिपादन स्त्रियांना मनोमन पटले होते. सत्याग्रहाच्या तंत्राने अगदी सामान्य अशिक्षित आणि अल्पशिक्षित स्त्रीलाही स्वातंत्र्य लढयात भाग घेण्याची संधी उपलब्ध करुन दिली. जंगलतोड कायद्याला विरोध, परदेशी कपडयांची होळी, दारुच्या दुकानांवर बहिष्कार आणि निरोधन मिठाचा सत्याग्रह इ. सर्व नि:शस्त्र चळवळीत स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या. राष्ट्रीय आंदोलनातील स्त्रियांच्या सहभागाचा एक परिणाम असा झाला ही देशातील अनेक कुटूंबेच्या कुटूंब स्वातंत्र्य चळवळीशी एकरुप झाली. भारतातील स्त्रियांचा स्वातंत्र्य लढयातील सहभाग हे भारताच्या स्वातंत्र्य लढयाच्या इतिहासात लिहलेले सोनेरी पान आहे. या चळवळी बरोबरच गांधीजींच्या खादी, हरिजनोद्वार ग्रामोउद्वार इ. विधायक कामांचा संदेश खेडोपाडी हिंडून सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य अनेक तरुणींनी धाडसाने केले.स्त्रियांच्या सहभागाचा आणखी एक परिणाम म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नांकडे देशाचे लक्ष वेधले जाऊन स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्याच्या कार्याला वेग आला.

राजकीय आंदोलनातील स्त्रियांच्या सहभागामुळे सुधारणेच्या चळवळीला गती मिळाली. १९२९ चा सारडा कायदा, हिंदू कोड बिल बहुपत्नीत्व विरूध्दचा कायदा अशा अनेक सुधारणा कायद्याच्या स्वरुपात भारतीय स्त्रीला मिळाल्या. इथे एक गोष्ट आवर्जून नमूद कराविशी वाटते की, जगातील अनेक देशामध्ये स्त्रियांना हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागामुळे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत स्त्रियांचे राजकीय आणि नागरी हक्क आपोआपच अंतर्भूत झाले. त्यासाठी त्यांना लढा द्यावा लागला नाही.गांधीजींच्या काळातील स्त्रीयांच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया एकाच वेळी अनेक स्तरावर घडली. सर्व समाज जीवनच परिवर्तन, संक्रमण व स्थित्यंतराच्या अवस्थेतून जात असल्याने स्त्री प्रगती समजावून घेण्यासाठी गांधीजींची स्त्रि मुक्तीविषयक विचार अभ्यासणे आवश्यक आहे. गांधींजींच्या कार्याने स्त्रीयांचे विश्व व्यापक होण्यास मोठा हातभार लागला.

**निष्कर्ष:—**

१) महात्मा गांधीजींनी स्त्रीमुक्तीसाठी फार मोठे योगदान दिले.
२) महात्मा गांधीजींच्या स्त्रीमुक्ती चळवळीने समाजातील रुढी, परंपरांना छेद देण्याचा प्रयत्न केला.
३) गांधीजींच्या नि:शस्त्र सामाजिक चळवळीत स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या.
४) गांधीजींनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिले.

**संदर्भ ग्रंथ:—**

१) गांधी मो. क — मेरे सपनोंका भारत—मंत्री सर्व सेवा संघ, वाराणसी
२) गांधी एम. के— दिल्ली डायरी, सुलभ मुद्रणालय, पुणे—२
३) महात्मा गांधी यांचे संकलीत वाडमय— महात्मा गांधी वाडमय प्रकाशन समिती करिता संचालक, प्रसिध्द विभाग महाराष्ट्र मुंबई १
४) प्यारेलाल — अखेरच पर्व (खंड ३) पराग एजन्सीज, अकोला जाने २००४.
५) मोहनराव यु. एस — महात्मा गांधीचा संदेश — माहिती व नभोवानी मंत्रालय भारत सरकार.
६) वकील व्यंकटेश — गांधी विचार दर्शन — गांधी वाडमय प्रकाशन समिती १२४२ सदाशिव विद्यापीठ वाडा, पुणे — २
७) तेंडुलकर डी. जी — महात्मा खंड भारत सरकार प्रकाशन, १९५६.
८) प्रा. पानसे रमेश — नयी तालीम — गांधी प्रणित शिक्षण विषयक प्रयोगांचा इतिहास गांधी सेवा संघ सेवाग्राम वर्धा.
९) शिखरे दा. न — गांधी विचार दर्शन खंड सहावा, महाराष्ट गांधी स्मारक निधी प्रकाशन, गांधी प्रवन, कोथरुड पुणे
१०) दामले सिताराम केशव — म. गांधी, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई.
११) पंडित नलिनी — 'गांधी' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई १९८३.
१२) गांधी, मनुवहन — एकला चलोरे, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, १९५६.